**आदिवासी क्षेत्र उपयोजना/ आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना मार्च,२०११ च्या अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या "नगर विकास" या उपशिर्षाखालील योजनांतर्गत राज्यस्तरीय तरतूदीचे वाटप.**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र.बीयुडी-२०११/प्र.क्र.७/का.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०११.

**वाचा :** १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.लेखानु -२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दि.३१.३,२०११
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.लेखानु -२०.११/प्र.क्र.३७/अर्थसंकल्प-४, दि.८.४,२०११
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अंदाज २०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.६ मे, २०११
४) शासन परिपत्रक क्र.अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.२१ सप्टेंबर, २०११.
५) शासन निर्णय क्र.आवसु-२०११/प्र.क्र.१८३/का.१७, दिनांक २०.१०.२०११

**<u>शासन निर्णय :-</u>** आदिवासी उपयोजनांतर्गत **"नगर विकास"**या उपशिर्षाखाली सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे योजनानिहाय व जिल्हानिहाय वाटप आणि प्रत्येक योजनांचे नियंत्रण अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत. आता "महाराष्ट्र विनियोजन विधेयक सन २०११" (महाराष्ट्र विनियोजन (लेखाअनुदान) अधिनियम,२०११ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या रक्कमांसह) यास विधानमंडळाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेले आहे, आणि ते २०११ चा अधिनियम क्रमांक <u>१७</u> म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ८ दिनांक २१.४.२०११ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्यामुळे आदिवासी उपयोजनेच्या सन २०११-१२ करीता नगरपालिका निहाय / योजनानिहाय / जिल्हानिहाय केलेल्या तरतूदी शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या असून सदर तरतूदी वितरीत करुन खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. तसेच सदर खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करावा. मासिक विवरणपत्रानुसारचा निधी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीमध्ये पुढे-मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.त्याचप्रमाणे सर्व नियंत्रक अधिकारी / अंमलबजावणी अधिकारी यांनी सदर तरतूदी खर्च करतांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अंदाज २०११/प्र.क्र.९३/अर्थसंकल्प-३, दि.६ मे, २०११ च्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. वित्तीय वर्ष सन २०११-१२ च्या प्रथम नऊमाही करीता आवश्यक असणारा योजनेतर व योजनांतर्गत अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७५ टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरित केला जाईल. डिसेंबर अखेर खर्चाचे प्रमाण ६५ टक्केपेक्षा कमी असल्यास याप्रमाणात सुधारित अंदाजात कपात करण्यात येईल. सुधारित अंदाज सन २०११-१२ मंजूर करताना प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाणातच मंजूर केले जातील याची नोंद घ्यावी.

४. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील मान्य योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी <u>मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च</u> करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

५. आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लोकांकरिता वा आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लोकांकरिता खर्च करण्यात यावी. आदिवासी उपयोजनेंतर्गत केलेली तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर किंवा सर्वसाधारण योजनेखाली खर्च

करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेत केलेली तरतूद खर्च झाली नाही तर सदर तरतूद प्रत्यार्पित करावी व कोणत्याही परिस्थितीत आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च करण्यात येवू नये. जर आदिवासी उपयोजनेची तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च झालेली आढळल्यास याबाबत संबंधित मुख्यधिकारी नगरपरिषद, नंदूरबार यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल लेखाशिर्षनिहाय/उप लेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती सबंधित क्षेत्रिय अधिकारी ( मुख्याधिकारी, नगरपरिषद नंदूरबार) यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, नगर विकास विभाग व आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

६. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल व तो केंद्रशासनाला कळविता येईल.

७. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी प्रचलित नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन उपरोक्त परिच्छेद क्र ४. मधील सूचनानुसार खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी /नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुदीस प्रशासकीय दृष्टया मान्य केलेल्या योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

**८. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्र उपयोजना (टिएसपी) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओटिएसपी) यांचा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यात आले असल्यास हे बदल लक्षात घेवून खर्च नोंदविताना सुधारित लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.**

**९.** उपरोक्त संदर्भाधिन क्र.४ च्या अनुषंगाने वित्त विभागाने ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या शिर्षाखालील अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी ५०% पर्यंत रक्कम वित्त विभागाचे पूर्व सहमतीशिवाय आहरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या तपशीलवार शिर्षाखालील तरतूदी वितरणासाठी वित्त विभागास अपेक्षित असलेली माहिती व पूर्वी वितरीत केलेल्या रकमांचे विनियोग प्रमाणपत्रे विभागाने सादर केल्यास अर्थसंकल्पीत तरतूदीच्या ७५% पर्यंत निधी वितरीत करता येईल.

**१०.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा **संगणक सांकेतांक २०१११९०४१३५०३८००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( श. र. सावंत )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रति,**

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
विभागीय आयुक्त, नाशिक.
जिल्हाधिकारी, नंदूरबार
संचालक, नगर रचना, पुणे (बजेट ३ प्रती )
सहायक संचालक, नगर रचना, नंदूरबार
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार
जिल्हा कोषागार अधिकारी, नंदूरबार
मुख्य अधिकारी, नगरपरिषद, नंदूरबार
महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.(प्रत्येकी २ प्रती)
वित्त विभाग / नगर विकास विभाग / नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
कार्यासन अधिकारी का.क्र. २, १७ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती (का-६)

**आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील २०११-१२ चे अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप**
**(टि.एस.पी.)**

<table>
<tr><td colspan="2">शिर्ष :- नगर विकास<br>योजनेचे नांव :- नागरी आदिवासी वस्ती सुधारणा<br>(राज्यस्तर योजना)</td><td colspan="3">मागणी क्रमांक :- टी - ५<br>मुख्य लेखाशिर्ष :- २२१७-नगर विकास-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- ८०- सर्वसाधारण-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) नागरी आदिवासी वस्ती सुधारणा<br>(२२१७ १२५९) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)</td></tr>
<tr><td>जिल्हयाचे नांव</td><td>२०११-१२ साठी केलेली तरतूद</td><td>२०११-१२ ची अर्थसंकल्पीय तरतूद सुर्पूद करण्यात आलेला नियंत्रक अधिकारी</td><td>प्रशासकीय विभाग</td><td>शेरा</td></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>नगरपरिषद, नंदूरबार</td><td>१३४५८</td><td rowspan="2">प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-३२.</td><td rowspan="2">नगर विकास विभाग,<br>मंत्रालय, मुंबई</td><td rowspan="2"></td></tr>
<tr><td>एकुण नंदूरबार</td><td>१३४५८</td></tr>
</table>